॥श्री॥

# "पडदा"

लेखक - शरदचंद्र गोविंद लिमये
सातारा

मी "खिडकी" या विषयावर लिहलेला चिंतनपर लेख माझ्या पत्नीला वाचाव दिला. त्यावर तिने अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. "अहो! तुम्ही खिडक्या दाखवल्या पण त्यावरील पडद्यांचा पुसटसा उल्लेखही केला नाहीत तेंव्हा आता पडदे "लावा म्हणजे "पडदा" याबद्दल कांहीतरी लिहा. त्यामुळं "पडदा" या विषयावर चिंतन करण्याची कल्पना आवडली आणि लगेच कागद पेन सरसावून कामाला लागलो.

"परदेमें रहने दो - परदा ना उठावो - परदा जो उठ गया तो भेद खुल जाएगा या गाण्याची आठवण झाली. प्रत्येक घटना ही एका विशिष्ट पडद्यामागेच घडत असत एकदा पडदा बाजूला झाला की पलीकडील रहस्याचा भेद होतो - पलीकडील दृश्य अ नजरेसमोर येते.

पडदे किती प्रकारचे - नाट्यगृह व चित्रपटगृहातील पडदे, घरातील दारे व खिडक्या वरील पडदे, वाहनातील पडदे, डोळ्याचा पडदा, जनानखान्यातील पडदे, महालातील पडदे, अशा अनेक ठिकाणी हे पडदे आपले स्थान राखून आहेत. ए गोष्ट झाकणे, अंधारात ठेवणे हे पडद्याचे मुख्य कार्य असले तरी स्थल कालानुसार त्याच योजना केलेली असते. विवाह प्रसंगीही अंतरपाटाची योजना केलेली असते.

नाट्यगृहात गेल्यावर आपणास रंगमंचावर भला मोठा लाल रंगाचा एक पडदा सोडलेला असतो तो प्रथम दृष्टीस पडतो. त्याने पूर्ण रंगमंच झाकलेला असतो. हा पडदा बाजूला झाल्यावरच त्यामागे घडणारे नाट्य आपण पाहू शका अलिकडच्या काळांत ही प्रथमदर्शनी एकच पडदा असतो. पूर्वीच्या काळी रंगमंचावर वेगवेगळी चित्रे वा दृश्ये रंगवलेले भले मोठे पडदे असायचे. मुख्य पडदा (मेन ड्रॉप) बाजूला झाला की रस्त्याचा देखावा असलेला पडदा, त्याचे मागे महालाचा दे असलेला, त्यानंतर जंगलाचा देखावा असे पडदे लावलेले असत. प्रवेशानुसार या पडद्यांना खालीवर केले जायचे. मुख्य पडद्यावर श्री शंकर-पार्वती व गणेश यांची चित्रे रंगवलेली असत. आता असे पडदे काळाच्या पडद्याआड गेले त्यांची जागा बॉक्स सेट, फिरता रंगमंच, सरकता रंगमंच, प्रतिकात्मक रंगमंच इ. यांनी घेतली हल्ली मुख्य पडदा दोन बाजूला सरकणारा वीजेवर चालणारा पडदा असतो.

पान २ वर

चित्रपटगृहामध्ये भला मोठा पांढऱ्या रंगाचा पडदा स्थीरपणे कायमचा बांधलेला असतो त्याच्या अवतीभवती काळ्या रंगाचे पडदे, झालरी लावलेल्या असतात. या पडद्यावरील चित्र स्पष्ट दिसण्यासाठी ही योजना असते. प्रेक्षागृहात प्रेक्षकांना येण्याजाण्याच्या दरवाजालाही काळ्या रंगाचेच पडदे असतात.

विवाह प्रसंगी वधू वरांच्या मध्ये "अंतरपाट" नावाचा एक पडदा दोन मान्यवरांनी धरलेला असतो. खरं तर वधू वरांनी एकमेकांचा चेहरा पाहू नये यासाठी याची योजना असावी पण हल्ली या विवाहापूर्वीच या दोघांनी म्हणजे वधूवरांनी अनेक वेळा एकमेकांच्या चेहऱ्याची अनेक प्रकारे रुजवात घातलेली असतेच.

आपले डोळे हे महत्वाचे इंद्रिय ज्यामुळे आपण हे जग पाहू शकतो. या डोळ्याच्या रचनेतही एक पडदा असतो त्याला शास्त्रीय नाव वेगळे आहे पण या – पडद्याला दुखापत झाली तर आपली दृष्टी बिघडते, नजर कमी होते. त्यावर वेळीच उपचार करण्याची गरज असते अन्यथा डोळा गमावण्याची वेळ येते. हे डोळे म्हणजे नयन - नेत्रपटल म्हणजेच डोळ्याचा पडदा त्या डोळ्यावर असे साढू लागली की नजर अंधुक होते.

राजमहालातील पडदे हे राजवैभवाची साक्ष द्यायचे. पूर्वी अशा महालातील स्त्रीया पडदानशीन असायच्या. त्या तलम - झिरझीरीत पडद्याआड असायच्या. तसेच चिकाचे पडदे सरळे जायचे. पारदर्शक पडद्यातूनच राजस्त्रीया संभाषण करायच्या.

लहानपणी घरात "सिनेमा सिनेमा" खेळायचो. कुठल्यातरी चित्रपटाच्या फिल्मचे तुकडे गोळा करायचे. एका पुठ्याला चौकोनी भोक पाडून त्यात फिल्मचा तुकडा अडकवायचा. दुसऱ्या पुठ्यावर गोल भोक पाडून एक भिंग अडकवायचे. भिंगावर उन्हाचा कवडसा टाकून त्याचे पुढे फिल्म धरायची आणि भिंगातून येणारी प्रतिमा समोरच्या भिंतीवर दाखवायची. या भिंतीला वडिलांचे पांढरे धोतर बांधायचे आणि सिनेमा पहायचा. हे पांढरे धोतर म्हणजे आमच्या सिनेमाचा पडदा.

घराच्या सजावटीत फर्निचरबरोबर पडद्यांचेही महत्वाचे योगदान असते. घरात कोणत्या रंगाचे, डिझाइनचे पडदे लावायचे हे सर्वस्वी गृहिणींचाच हक्क असतो. खिडक्यांना, दारांना पडदे लावण्याबाबत सर्व काही अधिकार, निवड फक्त त्या गृहिणीकडे दिले जातात.

हॉस्पीटलमध्येही प्रत्येक वॉर्डात, तपासणी खोलीत एकाच रंगाचे पडदे वापरण्याची पद्धत आहे. हॉटेलमध्ये भटारखान्याकडे जाण्याच्या दारावर लावलेला पडदा प्रेक्षणीय व अवर्णनीय असतो.

पान उलट

एस.टी. गाड्या सुरू झाल्या त्याकाळी एस.टी. गाड्यांमध्ये खाकी जाड कापडाचे पडदे लावलेले आत असत हे आपणास आठवते का? त्यानंतर काचेच्या खिडक्या अस्तित्वात आल्या. खाजगी वाहनांमध्ये विशेषतः ट्रॅव्हल्स मध्ये रंगीत पडदे असतात.

कपट कारस्थाने, कृष्ण कृत्ये अंमलात आणावयाच्या योजना अदृश्य पडद्याआड आखल्या जातात. अशा कृष्ण कृत्यांचे पर्दाफाश करून उजेडात आणली जातात. संसारात पतीपत्नींचे तंटे होतात केवळ संशयावरून. पण वस्तुस्थिती समजून घेतली तर संशयाचा पडदा बाजूला होतो. राजकारणी लोकांची खलबते, चर्चा पडद्याआडच होत असतात त्याबद्दल झालेले निर्णय जाहिर केले गेले की त्या संबंधीत प्रकरणावर पडदा पडतो. आपली मते कोणासमोरही मांडताना कोणताही आडपडदा न ठेवता नम्रपणे खंबीरपणे मांडली जावीत. कितीही असत्य दडवायचा प्रयत्न केला तरी कधी ना कधी ते सत्य बाहेर येतेच. म्हणूनच म्हणतात. "संशयपटला दूर सारिता - प्रकाशेल की मग पुरे".

—०—

लेखक- शरदचंद्र गोविंद लिमये
शांतीवन
१६२ मंगळवार पेठ
सातारा ४१५ ००२
९४२२६०५४८२